# बृहन्मुंबई महानगरपालिका

घकव्य, जी/दक्षिण, ना. म. जोशी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - 400013.

क्र. स.अ.(घ.क.व्य.)जी.द./1035/एस.आर. दिनांक 29/09/2022

## "स्वारस्य अभिव्यक्ती" (E.O.I.)

## सेवाभावी संस्थांमार्फत कामगार पुरवठा करण्यासंबंधी सूचना

सदर सूचनेव्दारे जी/दक्षिण विभागातील सर्व नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना कळविण्यात येत आहे की, "श्री नवरात्रोत्सव 2022" दसरा सणा दरम्यान जी/दक्षिण विभागातील - 1) लोटस जेट्टी, रजनी पटेल चौक, डॉ. ऍनी बेझंट रोड, आणि 2) पी. बाळू बीच, पी. बाळु मार्ग या दोन विसर्जन स्थळांवर देवी विसर्जनां दिवशी निर्माल्य गोळा करणे, निर्माल्य विभक्त करणे व विसर्जन परिसर स्वच्छ ठेवण्याकरीता मागणीनुसार कामगार पुरविण्यासाठी खालिल अटी व शर्तीनुसार ईच्छुक सेवाभावी संस्थांनी सहाय्यक अभियंता (घकव्य) जी/दक्षिण विभाग, दुसरा मजला, जी/दक्षिण विभाग कार्यालय, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई -400 013 यांच्या नावे नोंदणी प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सहीत दि.01/10/2022 रोजी दु.1.00 वाजेपर्यंत अर्ज करावेत. सदर तारखे नंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही.

अटी व शर्ती :-

1. जी/दक्षिण विभागातील नोंदणीकृत असलेल्या संस्थांनीच त्यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणी असलेल्या वेंडर कोड व ई-मेल आय-डी सहीत विषयांकीत काम मिळण्याकरीता अर्ज करावेत.
2. जी/दक्षिण विभागात दोन विसर्जन स्थळांसाठी देवी विसर्जनांच्या एकुण 3 दिवसांकरीता आवश्यक एकुण 120 कामगारांच्या पुरवठ्यासाठी प्रति संस्था 60 कामगार प्रमाणे दोन संस्थांची सोडत प्रक्रियेव्दारे नेमणुक करण्यात येईल.
3. आठ तासांच्या दोन सत्रांमध्ये आवश्यकते व सूचनेनुसार जी/दक्षिण विभागात कामगारांचा पुरवठा करणे. तसेच देवी विसर्जन कालावधीत विसर्जन स्थळ तसेच त्याच्या भोवती 1 किमी परिघामधील रस्ते स्वच्छ ठेवणे संस्थेस बंधनकारक राहील.
4. संस्थांनी नेमून दिलेल्या ठिकाणी आवश्यक कामगारांचा पुरवठा करुन संबंधित कनिष्ठ अवेक्षक यांना दैनंदिन कामाचा अहवाल देणे बंधनकारक राहील.
5. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सद्य प्रचलित किमान वेतन धोरणानुसार वेतनाचे अधिदान रु.698.07 प्रतिदिन / प्रति कामगार अधिक (+) 49.58% लेव्हीचे अधिदान या दराने राहील.
6. कामासाठी लागणारे आवश्यक साहित्य, अवजारे तसेच कामगारांस आवश्यक सुरक्षा उपकरणे/साधने पुरविण्यास संस्था बंधनकारक राहील.
7. अयोग्य अर्ज कोणताही पत्र व्यवहार न करता फेटाळण्याचे तसेच विषयांकीत कामाचा कालावधी तथा मनुष्यबळाची संख्या ही परिस्थितीनुसार कमी-अधिक तथा स्थगित करण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त जी/दक्षिण विभाग ह्यांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घकव्य) जी/दक्षिण**